04 MAR 2026
पुण्यनगरी

# ‘रमण इफेक्ट’ विज्ञानातील क्रांती

- युवा शास्त्रज्ञ डॉ. निलेश तरवाळ यांचे प्रतिपादन
- भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये 'राष्ट्रीय विज्ञान दिन' उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विज्ञानातील शोध हे केवळ प्रयोगशाळेपुरते मर्यादित नसून ते मानवी जीवनाचा दृष्टिकोन बदलणारे असतात. भारतरत्न डॉ. सी. व्ही. रमण यांनी लावलेला ‘रमण इफेक्ट’ हा शोध जागतिक विज्ञानाच्या इतिहासातील एक सुवर्णक्षण आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थ विज्ञान विभागाचे सहाय्यक प्राध्यापक, युवा शास्त्रज्ञ डॉ. निलेश तरवाळ यांनी केले. भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर येथे ‘राष्ट्रीय विज्ञान दिना’निमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय घोरपडे यांनी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता वैज्ञानिक प्रयोगांतून नाविन्य शोधले पाहिजे. डॉ. जयंत कार्तिक यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. विकास तासगावकर यांनी आभार मानले.

0 4 MAR 2026

नवराष्ट्र
Paschim Maharashtra | 04 March 2026 | Page 4

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाषिक घोटाळे; विरामचिन्हे अनिवार्य

## शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरवदिनी आयोजित परिसंवादात सूर

▶ कोल्हापूर, (श. प्र.) भाषिक घोटाळे आणि उद्भवू शकणारे अप्रयोजित विनोद टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित विशेष परिसंवादामध्ये उमटला. शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या वि.स. खांडेकर भवनातील मराठी अधिविभाग रांगोळ्या आणि सुवासिक फुलांच्या माळांनी सजला. यानिमित्ताने 'विरामचिन्हांचा वापर आणि महत्त्व' या विषयावरील परिसंवाद रंगला. या परिसंवादात विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. अनिल गवळी आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ.गिरीष मोरे यांनी सहभाग घेतला. जनसंपर्क अधिकारी तथा विद्यापीठाचे मराठी भाषा अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



### विरामचिन्हे ही आहेत अर्थनिर्णयाची साधना

यावेळी डॉ. अनिल गवळी, डॉ. गिरीष मोरे यांनी, विरामचिन्हांमुळे वाक्याचा नेमका अर्थ स्पष्ट होऊन वाचन सुलभ होते. अर्थस्पष्टतेसाठी वाचकाची दमछाक टाळण्यासाठी विरामचिन्हे आवश्यक आहेत. विरामचिन्हे ही अर्थनिर्णयाची साधना होत. सर्वच लेखकांनी त्यांचा वापर करावा, असे आवाहन केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मृण्मयी पांचाळ या विद्यार्थिनीने मराठी भाषा गौरव गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर अमोल देशमुख यांनी आभार मानले.

04 MAR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध केंद्रांवर प्रगल्भ वाचक स्पर्धा उत्साहात

## जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांचा उपक्रमाला प्रतिसाद : हजारो विद्यार्थ्यांपर्यंत राजर्षी शाहूंचा विचार पोहोचवण्याचा प्रयत्न

- **५० स्वयंसेवक कार्यरत, वाचनसंस्कृती जोपासण्याचा प्रयत्न**

**जनप्रवास : गडहिंग्लज**

वाचनसंस्कृती जोपासण्याच्या आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रगल्भ वाचनाची सवय निर्माण करण्याच्या उद्देशाने वाचनकट्टा बहुउद्देशीय संस्था, कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली "प्रगल्भ वाचक स्पर्धा २०२५–२६" ही परीक्षा जिल्ह्यातील विविध केंद्रांवर उत्साहात पार पडली. या उपक्रमातून हजारो विद्यार्थ्यांपर्यंत राजर्षी शाहू महाराज यांचा विचार पोहोचवण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न यशस्वी ठरला.

या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रकाशित आणि प्रा. डॉ. नंदकुमार मोरे लिखित "Let's Know Our Shahu Maharaj" या इंग्रजी पुस्तकाची निवड करण्यात आली होती. शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याची ओळख नव्या पिढीला व्हावी, समता, शिक्षण आणि सामाजिक न्याय या मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजावी, या उद्देशाने पुस्तकाभोवती स्पर्धेची संकल्पना राबवण्यात आली. जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये जाऊन या उपक्रमाचे महत्त्व पटवून देण्यात आले. शिक्षक, मुख्याध्यापक आणि शैक्षणिक संस्थांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेक सामाजिक संस्था आणि वाचनप्रेमींनीही या चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवला.



**प्रगल्भ वाचक स्पर्धा २०२५–२६ या परीक्षेस बसलेले विद्यार्थी. ही परीक्षा जिल्ह्यातील विविध केंद्रांवर उत्साहात पार पडली.**

परीक्षेच्या दिवशी जिल्ह्यातील विविध केंद्रांवर सुमारे ५० स्वयंसेवक कार्यरत होते. ३० हून अधिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. प्रत्येक केंद्रावर शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात परीक्षा पार पडली. विद्यार्थ्यांनी पुस्तकाचा अभ्यास करून आत्मविश्वासाने प्रश्नपत्रिका सोडवल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळाले.

ही केवळ परीक्षा नसून वाचनसंस्कृती रुजवण्याचा आणि विचारांची पेरणी करण्याचा प्रयत्न असल्याचे आयोजक युवराज कदम, वनिता कदम यांनी सांगितले. शाहू महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेत समाजाभिमुख पिढी घडवण्याचा हेतू या उपक्रमामागे असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पुस्तक वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि इतिहासातील थोर व्यक्तिमत्त्वांविषयी जाण निर्माण व्हावी, या दृष्टीने ही स्पर्धा महत्त्वाची ठरली आहे.

या उपक्रमात सहभागी झालेल्या शाळा, शिक्षक, स्वयंसेवक, पालक आणि विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले. निरपेक्ष भावनेतून मिळालेल्या सहकार्यामुळेच हा उपक्रम यशस्वी झाला असल्याचे संस्थेचे अध्यक्ष युवराज कदम यांनी सांगितले. भविष्यातही वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी अशाच उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे नमूद केले.

या स्पर्धेमुळे जिल्ह्यात वाचनाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांमध्ये इतिहास, समाजभान आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाची जाणीव दृढ होण्यास मदत होणार आहे. वाचनकट्टा संस्थेच्या या उपक्रमाचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातून स्वागत होत आहे.

04 MAR 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी



## ज्ञान-विज्ञान

डॉ. व्ही.एन. शिंदे

# समाज व्यवस्था!

**'विचार करणारा, बुद्धीचा वापर करणारा मानव, टोळीचे किंवा आपल्या समूहाचे रक्षण करू शकतो. त्याचे सर्वांनी ऐकले पाहिजे', हा मानवी इतिहासात अस्तित्वात आलेला, पहिला नियम होता. खरेतर हा नियम अन्य प्राणीही पाळत होते. त्यातून अन्य प्राण्यांसारखेच मानवाचेही वर्तन होते. मात्र, त्यानंतर ज्यावेळी मानवाने शेती करण्यास सुरुवात केली, त्यानंतर समूहाला एकसंघ ठेवण्यासाठी आणखी नियम बनवण्याची गरज निर्माण झाली.**

मानवाने मूलतः संरक्षणासाठी एकत्र राहण्यास, टोळी बनवण्यास सुरुवात केली. अन्न मिळवताना शिकार करणे, तेही एकट्या-दुकट्याच्या जीवावर बेतणारे असायचे, त्यामुळे टोळी बनवून राहणे गरजेचे होते. अशा टोळ्या प्रामुख्याने गुहांमध्ये रहात. त्या निसर्गतः तयार झालेल्या असत. गुहेच्या आतमध्ये उन्हाळ्यात थंड, तर हिवाळ्यात उबदार वातावरण रहात असल्याने आपल्या टोळीला समावून घेऊ शकेल अशी गुहा सापडली की, निवाऱ्याचा प्रश्न सुटत असे.

त्यानंतर मानवाने वस्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी कृत्रिम पद्धतीने निवारा तयार करण्याची गरज निर्माण झाली. हा निवारा दगड, झाडांच्या फांद्या, गवत इत्यादी वापरून करण्यात येत असे. अशा निवाऱ्यामध्ये संपूर्ण टोळीला एकत्र रहाणे शक्य नव्हते, त्यामुळे टोळीमध्ये काही लोकांसाठी निवारा, अशी रचना होत गेली. यामध्ये पूर्वीही अनेक टोळ्यांनी स्त्री-पुरुष आणि त्यांची मुले असा समूह एका आसऱ्यामध्ये अशी ती व्यवस्था बनवणे गरजेचे बनले. तशी ती विकसित होत गेली. साधारण दोन ते तीन लाख वर्षांपूर्वीपासून दैनंदिन जीवनात ही व्यवस्था कमी-जास्त प्रमाणात टोळ्यांकडून पाळण्यात येत होती. त्यांच्या जगण्याला टोळीबाहेरून कोणी धोका निर्माण केला, तर त्यावर संपूर्ण टोळी हल्ला करत असे. मात्र, अंतर्गत असा कोणी असेल तर टोळीप्रमुख त्याला थेट टोळीतून काढून टाकत असे. एकट्याला जगणे त्या काळात शक्य नव्हते, त्यामुळे सहसा कोणी अंतर्गत कुरघोड्या करण्याच्या नादाला लागत नसे.

शेती आणि वस्ती हे दोन्ही साधारण दहा हजार वर्षांपूर्वी सुरू झाले. मानवी इतिहासातील हा बदल अनेक समस्या निर्माण करणारा होता. तोपर्यंत मानवाने प्राणी पाळण्यास सुरुवात केली होती. प्राण्यांसमवेत तो रहात असे. अनेकदा निवाराही एकत्र असायचा. जनावरांना फिरण्यासाठी तशी मर्यादित बंधने असत. त्यातून रोगराईला निमंत्रण मिळू लागले. अनेक लोक एकाच ठिकाणी रहात असल्याने संसर्गजन्य रोग, प्राण्यांपासून मानवाकडे आजार येणे ही प्रमुख समस्या बनली. त्यातच स्वच्छतेचा अभाव असल्याने साथीचे रोग निर्माण होऊ लागले, पसरू लागले. दुसरी समस्या निर्माण झाली ती अन्नटंचाईची. वस्ती करण्यास सुरुवात झाल्यानंतर, प्राण्यांची शिकार करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले; त्यामुळे मृत्यूदर घटला आणि लोकसंख्या वाढू लागली. मानव शेतीवर जास्त अवलंबून राहू लागला. यातून पाऊस न पडणे, पिके नष्ट होणे, पिके शाकाहारी प्राण्यांनी खाऊन टाकणे इत्यादी कारणांनी अन्नाची टंचाई भासू लागली. त्यातच आवडीचे पिक पुन्हा पुन्हा लावण्यात येऊ लागले, त्यामुळे एकाच पिकावर अवलंबून राहण्याचे प्रमाण वाढले. शेतीचाही, एकच पिक घेतल्याने कस कमी होऊ लागला. उत्पादन घटू लागले. यातून भीषण अन्नटंचाई निर्माण झाली. जमिनीवर मालकी निर्माण होऊ लागली. श्रीमंत आणि गरीब अशा भेदाची सुरुवात झाली. सर्वांनाच सर्व कामे करता येत नव्हती. वेगवेगळी कामे करणारे हात तयार होऊ लागले. त्यातून वर्गव्यवस्था तयार झाली. जमीन, पाणी, संसाधने यावरून भांडणे होऊ लागली. यातून लूटमार आणि आक्रमणे वाढली.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

या सर्व गोष्टींचे परिणाम त्या त्या टोळीतील ज्येष्ठांना जाणवत होते, दिसत होते. त्यांना शेतीतील कामे जमत नसली तरी पूर्वीचा आणि आताचा काळ त्यांच्या डोळ्यासमोर येत होता. हे का घडत असावे यावर ते विचार करत होते. मानव जात सुरक्षित ठेवायची असेल तर त्याला हवे ते मिळायला हवे, यातून त्याने प्रयोग करायचे ठरवले. तोपर्यंत लेखन-वाचन प्रक्रिया सुरू झाली नव्हती, मात्र संवाद सुरू झाला होता. असाच एक प्रयोग म्हणून शेतीची जागा बदलली. जंगलातील झाडे तोडून नवी जागा तयार केली. नव्या जागेवर शेती केली आणि ती पूर्वीसारखी पिकली. पुढच्या वर्षी हा प्रयोग अनेकांनी केला आणि निष्कर्ष तोच निघाला. यातून 'शेतीची जागा दर दोन-तीन वर्षांनी बदलल्यास उत्पन्न चांगले मिळते' हे लक्षात आले. हा खरे तर शेतीबाबत वैज्ञानिक प्रयोग होता, मात्र तो शास्त्रीय पद्धतीने नव्हता. तरीही या प्रयोगातून मिळालेले ज्ञान मौखिक रूपात पुढच्या पिढीकडे दिले जात होते. शिकार, शेती, फळे आणि कंदमुळे काढण्याची कौशल्ये अशीच ज्ञान म्हणून हस्तांतरित होत होती.

याबरोबर मानवाला शिकार करण्यासाठी जेवढे कष्ट पडत, त्यापेक्षा जास्त कष्ट शेतीमध्ये करावे लागत होते. मात्र, स्थिरता आणि संरक्षण या बाबीमुळे मानवाने वस्ती करून राहणेच पसंत केले. मात्र, यातही कष्ट न करता सर्व काही मिळावे अशी मानसिकता असणारे काही लोक होते. ते चोरी करणे, इतरांना त्रास देणे अशा गोष्टी करत, त्यामुळे वाद निर्माण होऊ लागले. ते टाळण्यासाठी सभ्यता निर्माण होण्याची गरज भासू लागली. ज्येष्ठांनी यासाठी नियम बनवण्यास सुरुवात केली. इसवी सन पूर्व ३००० ते २००० या कालखंडात प्रथम असे नियम बनवण्यात आले. अर्थात हे नियम लिखित स्वरुपात नव्हते. त्यातून रूढी, प्रथा आणि परंपरा निर्माण झाल्या. ज्या विषयासाठी नियम नसत, तेथे वडीलधारी मंडळी निर्णय घेत असत.

पुढे लिहिण्याची पद्धत विकसित झाली आणि 'कोड ऑफ हमुराबी' हे इसवी सन पूर्व १७५४ मध्ये अस्तित्वात आले. बाबीलोन येथे तयार झालेला हा कायदा, सर्वाधिक प्राचीन लिखित कायदा मानला जातो. प्राचीन ग्रीकमध्ये '१२ तक्ते', हा कायदा प्रसिद्ध होता. जगभर असे नियम अस्तित्वात आले. समाज सभ्य रहावा, समाजात शिस्त, न्याय आणि सुव्यवस्था राहण्यासाठी नियम बनवण्यास सुरुवात झाली. सुरुवातीला हे सर्व नियम परंपरेवर आधारित होते. पुढे ते लिखित स्वरूपात आले. अर्थात, हे सर्व विचारातून आणि पूर्वानुभवावरून आले. 'चिंतन' यातील अविभाज्य घटक आहे. चिंतनातून प्राप्त ज्ञानाच्या आधारावर हे सर्व घडत गेले. एकीकडे समाजव्यवस्थेचे आरोग्य ठीक रहावे यासाठी जसे हे चिंतन सुरू होते, तसेच किंवा त्यापेक्षा जास्त चिंतन मानवाचे जीवन कमी कष्टाचे व्हावे यासाठी होते. यातूनच समाजशास्त्रांची सुरुवात झाली. मात्र, विज्ञान सुरू होण्यासाठी आणखी खूप वेळ होता.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

0 4 MAR 2026
सकाळ

# प्रगल्भ वाचक स्पर्धेला प्रतिसाद

कोल्हापूर : वाचनकट्टा बहुउद्देशीय संस्थेतर्फे आयोजित प्रगल्भ वाचक स्पर्धा ही परीक्षा जिल्ह्यातील विविध केंद्रांवर झाली. या उपक्रमातून हजारो विद्यार्थ्यांपर्यंत राजर्षी शाहू राजांचा विचार पोहोचवण्याचा प्रयत्न यशस्वी ठरला. स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ प्रकाशित, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे लिखित पुस्तकाची निवड केली होती. चार ते पाच महिन्यांपासून संस्थेतर्फे जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये जाऊन या उपक्रमाचे महत्त्व सांगितले. शिक्षक, मुख्याध्यापक आणि शैक्षणिक संस्थांनी उपक्रमाला प्रतिसाद दिला. तीसहून अधिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ही केवळ परीक्षा नसून वाचनसंस्कृती रुजवण्याचा आणि विचारांची पेरणी करण्याचा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले. निरपेक्ष भावनेतून मिळालेल्या सहकार्यामुळेच हा उपक्रम यशस्वी झाला असल्याचे संस्थेचे अध्यक्ष युवराज कदम यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 MAR 2026 पुण्यनगरी

# इतिहास परिषद अध्यक्षपदी डॉ. मोरे

## उपाध्यक्ष प्रा. डॉ. नाईक, डॉ. मचले सचिव तर पोवार खजानिस


डॉ. राजेंद्र मोरे


प्रा. डॉ. चंद्रवदन नाईक


डॉ. दत्तात्रय मचाले


सुरेश पोवार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास परिषदेच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे तर उपाध्यक्षपदी प्रा. डॉ. चंद्रवदन नाईक यांची निवड करण्यात आली. शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद व सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २८ व्या अधिवेशनातील वार्षिक सर्वसाधारण सभेत नवीन कार्यकारिणी (२०२६–२०२९) जाहीर करण्यात आली. या नवीन कार्यकारिणी निवडीसाठी मार्गदर्शक म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

इतर कार्यकारिणीमध्ये सचिव डॉ. दत्तात्रय मचाले, खजिनदार सुरेश पोवार सहसचिव डॉ. रणजित माने, पदसिध्द सदस्य डॉ. अवनीश पाटील, सदस्य डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. सुरेश चव्हाण, डॉ. तानाजी हवालदार, डॉ. अनिल कुंभार, डॉ. बाळासाहेब कोटलगी यांचा समावेश आहे.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास विभाग व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सातारा, सांगली व सोलापूर या चारही जिल्ह्यामधील वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांमधून इतिहासाचे अध्ययन करणाऱ्या प्राध्यापकांनी एकत्र येऊन १९९३ मध्ये शिवाजी विद्यापीठ इतिहास प्राध्यापक परिषदेची स्थापना केली आहे. एकूण २८ अधिवेशनामध्ये सादर झालेल्या शोध निबंधांचे प्रकाशन हे देखील परिषदेचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट इतिहास संशोधकांनी अतिशय जिद्दीने व परिश्रमपूर्वक सादर केलेले शोधनिबंध परिषदेच्या दप्तरातच पडून न राहता जिज्ञासूपर्यंत पोहोचणे अत्यंत गरजेचे असते. त्यासाठीच सादर केलेल्या शोधनिबंधांची 'संशोधन पत्रिका' परिषदेमार्फत प्रकाशित करण्यात येते

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

04 MAR 2026





कोल्हापूर : चंद्रग्रहणानंतरचा कोल्हापूरच्या क्षितिजावरील चंद्र. २) चंबुखडी टेकडीवर दुर्बिणीतून चंद्रग्रहण पाहताना खगोलप्रेमी व नागरिक. (छाया : पप्पू अत्तार, नाज ट्रेनर)

# कोल्हापूरच्या क्षितिजावर दिसले ‘होळी पौर्णिमेचे’ छायाकल्प चंद्रग्रहण

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

रंगांचा उत्सव असलेल्या होळी पौर्णिमेच्या रात्री कोल्हापूरकरांना दुर्मीळ खगोलीय घटनेचे दर्शन घडले. सूर्यास्तानंतर कोल्हापूरच्या क्षितिजावर आकाशात ‘छायाकल्प चंद्रग्रहण’ पाहण्याची पर्वणी खगोलप्रेमींना मिळाली.

खगोलशास्त्रानुसार जेव्हा सूर्य, पृथ्वी व चंद्र एका सरळ रेषेत येतात व पृथ्वीची सावली चंद्रावर पडते, तेव्हा चंद्रग्रहण घडते. खग्रास चंद्र ग्रहणाचा प्रारंभ दुपारी ४ वाजून ३४ मिनिटांनी झाला. परंतु, कोल्हापुरात मंगळवारी संध्याकाळी ६ वाजून ४० मिनिटांनी खंडग्रास अवस्थेतच चंद्रोदय झाला. सायंकाळी ६ वाजून ४७ मिनिटांनी चंद्र पृथ्वीच्या उपछायेमध्ये शिरल्याने तो तांबूस-राखाडी रंगाचा दिसू लागला. सायंकाळी ७ वाजून ५३ मिनिटांनी हे ग्रहण पूर्णपणे सुटले. या खगोलीय घटनेचा प्रवास ५ तास ३९ मिनिटांचा होता.

## ग्रहणकाळात अंबाबाई मंदिरात विधी नित्यनेमाने

मंगळवारी चंद्रग्रहण काळात करवीरनिवासिनी श्री अंबाबाई मंदिरातील धार्मिक विधी, पूजा, आरती नित्यनेमाने करण्यात आले, अशी माहिती पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे व्यवस्थापक महादेव दिंडे यांनी दिली. मंगळवारच्या चंद्रग्रहणाचा प्रभाव कोल्हापुरात नसल्याने देवस्थानच्या वतीने अंबाबाईच्या पूजाविधीत कोणतेही बदल केले नाहीत.

> होळीच्या सणाचे औचित्य असतानाच घडलेल्या या घटनेमुळे विज्ञानाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. चंद्रग्रहण ही केवळ एक सावलीचा खेळ असलेली खगोलीय घटना आहे, असा संदेश या निरीक्षणाद्वारे देण्यात आला. धार्मिक विधींसोबतच वैज्ञानिक कुतूहल शमवण्यासाठी नागरिक निरीक्षणात सहभागी झाले होते.
>
> - डॉ. राजीव व्हटकर,
> समन्वयक, अवकाश संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ.

छायाकल्प ग्रहणामध्ये चंद्र पृथ्वीच्या गडद सावलीतून न जाता फिकट सावलीतून जातो. त्यामुळे त्याच्या तेजात किंचित घट होऊन तो वेगळ्या रंगात दिसतो.

चंबुखडी टेकडीवर खगोलप्रेमींनी आठ मिनिटांचे चंद्रग्रहण पाहण्यासाठी गर्दी केली होती. खगोल अभ्यासक किरण गवळी यांनी मार्गदर्शन केले. आनंद आगळगावकर, रौनक देशपांडे व नील वणकुद्रे यांनी दोन शक्तिशाली दुर्बिणी खगोलप्रेमींना चंद्रग्रहण पाहण्यासाठी चंबुखडी टेकडीवर लावल्या होत्या.

04 MAR 2026
पुण्यनगरी

# स्पर्श, गंधातून दिव्यांगांनी अनुभवले वनस्पतीजगत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दृष्टीदिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'बीजारोपण ते उत्पादन' या विषयावर विशेष 'सुगम्यविज्ञान' उपक्रमा राबविण्यात आला. याअंतर्गत स्पर्श, गंध, आकार आणि चवीच्या माध्यमातून विविध वनस्पती ओळखण्याचे तंत्र या दिव्यांग विद्यार्थ्यांनी आत्मसात केले. वनस्पतीजगताची अनोखी ओळख आणि अनुभव या विद्यार्थ्यांना घेता आला. राष्ट्रीय विज्ञान दिन २०२६ अंतर्गत शिवाजी विद्यापीठात युजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने दृष्टि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधारित विज्ञान उपक्रम राबविण्यात आला. बीजरोपणापासून उत्पादनापर्यंतच्या प्रक्रियेचे प्रात्यक्षिक सादर करत वनस्पतींची वाढ, बियांची रचना, अंकुरण प्रक्रिया, रोपांची निगा आणि शेतीतील उत्पादन याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना विविध फळे, मसाले, औषधी व सुगंधी वनस्पतींचे स्पर्श, गंध तसेच चव यांच्या माध्यमातून ओळख करून देण्यात आली. या उपक्रमात सुशिलाबाई घोडावत अंध विद्यालय (सांगली–मिरज), ज्ञान प्रबोधन भवन संचलित अंध विद्यालय (कोल्हापूर) आणि श्री सद्गुरु धोंडीराज निवासी अंध विद्यालय (पलूस) येथील सुमारे शंभर दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यांच्यासोबत त्यांचे शिक्षक आणि पालकही उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. माधुरी वाळवेकर, संयोजक डॉ. एस. आर. यन्कंची, युजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसेबिलिटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वर्षा जाधव आणि डॉ. एस. ए. पाटील यांनी उपक्रमाचे नियोजन केले.

**▪ शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिन**

04 MAR 2026

पुढारी

# विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागात उद्यापासून दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या वतीने गुरुवारपासून (दि. ५) दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले आहे. 'एम्ब्रेसिंग डायव्हर्सिटी : रिइमेजिनिंग इन्क्लुसिव एज्युकेशन इन अ ग्लोबलाइज्ड वर्ल्ड' हा मुख्य विषय आहे. परिसंवादाचे उद्घाटन गुरुवारी (दि. ५) सकाळी १०.३० वाजता विद्यापीठातील शिक्षणशास्त्र सभागृहात होणार आहे. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र.कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, प्रमुख पाहुणे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. संजीव सोनवणे, आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. अजय साळी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे व समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी केले आहे.

0 4 MAR 2026

सकाळ



कोल्हापूर : टाकाळा येथील विरंगुळा केंद्र येथे लेखिका मंजूश्री गोखले लिखित 'ज्ञानाई' ग्रंथाचे प्रकाशन करताना मान्यवर.

# 'ज्ञानाई' हा मराठी साहित्यातील एक महत्त्वाचा ग्रंथ : डॉ. रणधीर शिंदे

कोल्हापूर, ता. ३ : ज्ञानेश्वरीचा हा काव्यात्मक अनुवाद मराठी साहित्यात मोलाची भर टाकणारा आहे. अनेक प्राकृत शब्दांचे सध्याच्या भाषेत समानार्थी शब्द 'ज्ञानाई'मध्ये आहेत. त्यामुळे अर्थ सुलभ व सुबोधरित्या कळतो. 'ज्ञानाई' बा ग्रंथ मराठी साहित्यातील एक महत्त्वाचा ग्रंथ आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

कोरगावकर धर्मादाय संस्था संचलित ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रामध्ये सकाळ प्रकाशन प्रकाशित लेखिका मंजुश्री गोखले यांनी लिहिलेल्या, ज्ञानेश्वरीचा ओवीबद्ध अनुवाद असलेल्या 'ज्ञानाई' या ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात बोलत ते होते.

लेखिका गोखले म्हणाल्या, 'सर्वसामान्य कादंबरीसारखा हा ग्रंथ नाही. याचे प्रकाशन होते हे माझ्यासाठी खूप मोलाचे मानते. 'ज्ञानेश्वरी'चा एक भाग म्हणून हा ग्रंथ पुढील पिढीसाठी प्रेरक ठरेल. या ग्रंथाचे लिखाण करीत असताना येणाऱ्या प्रत्येक अडचणी सहज सुटत गेल्या. या ग्रंथाचे प्रकाशन कुठे करायचा हा प्रश्न समोर असताना 'सकाळ प्रकाशना'ची आठवण झाली. याविषयी बोलताच 'सकाळ'ने क्षणाचाही विलंब न करता प्रकाशनाला होकार दिला.' कार्यक्रमाची सुरुवात राजारामपुरी येथील नेहरू विद्यालयाच्या दुसरीच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या दिंडीने झाली.

ह.भ.प. रामचंद्र यादव महाराज आणि व्याख्याता कमलताई हर्डीकर यांनी मनोगत केले. निलांबरी कुलकर्णी, गौरी भोले, नंदकुमार गोखले उपस्थित होते. प्रिया दंडगे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रमिला जरग यांनी आभार मानले.

0 4 MAR 2026

पुढारी

# वैज्ञानिक क्षेत्रात महिलांची संख्या वाढावी : डॉ. साळी

**कोल्हापूर :** विकसित भारताच्या उभारणीमध्ये विज्ञानाची भूमिका महत्त्वाची राहणार असून वैज्ञानिक क्षेत्रातील महिलांची संख्या वाढणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने या क्षेत्रात आजपर्यंत महिलांनी बजावलेल्या कार्याची माहिती होण्यासाठी त्याविषयीच्या पुस्तकांचे वाचन करणे गरजेचे आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या आंतर विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय साळी यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे विज्ञानातील महिला या विषयावरील विशेष ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले होते, यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. धनंजय सुतार, डॉ. सचिनकुमार पाटील उपस्थित होते.